**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतासोबत भागिदारीसाठी जगभरातल्या देशांना आणि भारतात गुंतवणुकीसाठी जगातल्या उद्योजकांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- शिक्षण, व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, आरोग्य यासारख्या क्षेत्रात भारत आणि ब्रिटनमध्ये सामंजस्य करार, भारतातून मोठी गुंतवणूक मिळेल अशी ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांना आशा

- साहित्याचा यंदाचा नोबेल पुरस्कार हंगेरियन लेखकाला जाहीर

आणि

- एकदिवसीय महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताकडून दक्षिण आफ्रिकेसमोर २५२ धावांचं आव्हान

**<><><><><>**

जगभरातल्या सर्व देशांनी भारतासोबत भागिदारी करावी आणि जगातल्या सर्व गुंतवणूकदारांनी भारताच्या आर्थिक वृद्धीच्या वेगात सहभागी व्हावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्यासोबत उद्योजकांना त्यांनी संबोधित केलं. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

***- - होल्ड - कॅप्सूल - -***

*(ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताकडून होत असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती उपस्थितांना दिली. जनहितासाठी भारतात डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं मोदी म्हणाले.*

***- - प्रधानमंत्री बाइट १ - -***

*देशातल्या प्रत्येक जिल्ह्याला आणि प्रत्येक भाषेला AI चा लाभ व्हावा अशी आशा त्यांनी व्यक्त केली. एआयच्या नैतिक वापरासाठी भारतानं नेहमीच जागतिक व्यासपीठावर*

*स्पष्ट भूमिका घेतल्याची आठवण त्यांनी करुन दिली. जगभरात विकसनशील देशांना भारतात विकसित केलेलं तंत्रज्ञान वाटण्यासाठी भारत नेहमीच तयार असतो, असंही प्रधानमंत्री म्हणाले.*

*त्यापूर्वी दोन्ही नेत्यांनी सीईओ फोरमला संबोधित केलं. दोन्ही देशातला व्यापार दुप्पट करण्याचं लक्ष्य २०३० पूर्वी साध्य होईल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.*

**- - -होल्ड प्रधानमंत्री २ - -**

*दोन्ही देशातल्या उद्योगांना सहकार्यसाठी उपलब्ध असलेल्या विविध क्षेत्रांची माहिती त्यांनी दिली. दोन्हीकडच्या उद्योगांनी संयुक्तरित्या जगातले सर्वोत्तम उद्योग निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करावे, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.*

*दोन्ही देशांमध्ये दूरसंचार, एआय, जैव तंत्रज्ञान, सायबर, सेमीकंडक्टर, अंतराळ या क्षेत्रात भागीदारी वाढत असल्याचं ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर म्हणाले. द्विपक्षीय संबंध या वर्षात मोठ्या प्रमाणात वाढले, असंही त्यांनी सांगितलं.)*

**<><><><><>**

भारत आणि ब्रिटन हे नैसर्गिक भागीदार असून लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचं राज्य या मूल्यांवरचा विश्वास हा या भागीदारीचा पाया असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुंबईत आज राजभवनात ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्याशी प्रतिनिधी मंडळस्तरावर चर्चा झाल्यानंतर ते संयुक्तपणे पत्रकारांना संबोधित करत होते. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - -होल्ड कॅप्सूल - -**

*(ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांचा भारत दौरा हा दोन्ही देशातल्या भागीदारीतल्या व्यापक दृष्टी आणि ऊर्जेचं प्रतीक असून ही भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीचा आधार बनेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.*

***होल्ड - बाईट - प्रधानमंत्री ३***

*ब्रिटनमधले ९ विद्यापीठ भारतात कॅम्पस सुरू करणार असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. स्टार्मर यांच्यासोबत इंडो-पॅसिफीक क्षेत्रात शांतता प्रस्थापित करणं, युक्रेन-रशिया आणि गाझापट्टीतील संघर्ष थांबवण्याबाबत चर्चा झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. युक्रेन-रशिया*

*आणि गाझातील संघर्षावर शांततापूर्ण मार्गानं तोडगा काढावा यासाठी भारताचा पाठिंबा असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. भविष्यातल्या गरजा लक्षात घेऊन दोन्ही देश सहकार्य वाढवत आहेत. द्विपक्षीय व्यापार करारामुळं दोन्हीकडच्या उद्योजकांना बाजारपेठेत संधी मिळेल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असं स्टार्मर म्हणाले. भारतातून निघताना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करणारे गुंतवणुकीचे करार झालेले असतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारताला योग्य स्थान मिळावं अशी भूमिकाही त्यांनी मांडली.*

*दोन्ही देशांनी तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, शिक्षण, व्यापार आणि गुंतवणूक तसंच पर्यावरण बदल, आरोग्य आणि संशोधन क्षेत्रात विविध भागीदारी करार केले. त्यानुसार दोन्ही देश संपर्क आणि नवोन्मेश तसंच एआयच्या क्षेत्रात संयुक्त केंद्र स्थापन करणार आहेत. दोन्ही देशातल्या उद्योजकांचा मंच, भारत - ब्रिटन संयुक्त आर्थिक व्यवहार समिती, हवामान बदल तंत्रज्ञान निधी, आरोग्य क्षेत्रात भागीदारी यासारख्या मुद्द्यांचा त्यात सहभाग आहे.)*

**<><><><><>**

तंबाखू मुक्त युवक मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्याचा प्रारंभ आज नवी दिल्ली इथं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या उपस्थितीत झाला. चित्रपट, दूरचित्रवाणी आणि ऑनलाईन  प्लॅटफॉर्मचं तंबाखू विरोधी संदेश आणि आरोग्याबाबत इशारा देत तंबाखूचा प्रसार रोखण्यात भारतानं आघाडी घेतली आहे, असं पटेल यांनी यावेळी सांगितलं. सर्व प्रकारच्या तंबाखूच्या जाहिराती, प्रसिद्धी आणि प्रायोजकत्वाला सक्त मनाई करत तंबाखूच्या प्रसाराला आळा घातला आहे असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

'स्वच्छता ही सेवा' मोहिमेत दीड हजारापेक्षा जास्त ठिकाणं स्वच्छ केल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आज सांगितलं. या मोहिमेत स्वच्छता मोहिम, घरोघरी स्वच्छता, चित्रकला स्पर्धा, स्वच्छ रॅली आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसारखे २ हजार ७६६ कार्यक्रम घेतले. त्यात ५९ हजारांपेक्षा जास्त लोकांनी भाग घेतला. २५ सप्टेंबरला 'एक दिन, एक घंटा, एक साथ' अंतर्गत विशेष कार्यक्रम, तर २ ऑक्टोबरला स्वच्छ भारत दिवस आयोजित केल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना एका वकिलाने पीठाच्या दिशेनं बूट फेकण्याचा प्रयत्न करणं हे धक्कादायक होतं, मात्र आपण त्या घटनेचा विचार करत नाही असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी म्हटलं आहे. काही दिवसांपूर्वी ही घटना घडली होती, त्यानंतर पहिल्यांदाच गवई यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. वकील राकेश किशोर याचं कृत्य अक्षम्य होतं, केवळ सरन्यायाधीशांच्या उदारपणामुळेच त्याला सोडून देण्यात आल्याचं सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, वकील राकेश किशोर याच्यावर बंगळुरू इथं काल गुन्हा दाखल करण्यात आला.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी जनसुराज पक्षाने ५१ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

कर्नाटकात आता सर्व क्षेत्रातल्या महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीसाठी प्रत्येक महिन्याला एक भरपगारी रजा मिळणार आहे. कर्नाटक राज्य सरकारच्या आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही रजा राज्यातली सर्व सरकारी कार्यालयं, वस्त्रनिर्मितीचे कारखाने, बहुराष्ट्रीय कंपन्या, आयटी क्षेत्र आणि खासगी औद्योगिक क्षेत्रातल्या कार्यालयांना लागू असेल.

**<><><><><>**

दहशतवाद आणि व्यापार, तसेच पाणी आणि रक्त एकाच वेळी वाहत राहू शकत नाही असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. कॅनबेरा इथे ऑस्ट्रेलियाचे संरक्षणमंत्री रिचर्ड मारलेस यांच्याबरोबर घेतलेल्या द्विपक्षीय बैठकीच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते.

यावेळी माहितीची देवाणघेवाण, पाणबुडी शोध आणि बचावकार्य, तसेच परस्पर सहकार्यासंबंधित अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर करार करण्यात आले . संयुक्त युद्धसराव, सागरी सुरक्षा, आणि विज्ञानतंत्रज्ञान क्षेत्रातल्या संशोधनात दोन्ही देशांनी सहकार्य करण्याचा पुनरुच्चार करण्यात आला.

**<><><><><>**

साहित्य निर्मितीसाठीचा नोबेल पुरस्कार यंदा हंगेरियन लेखक लास्लो क्राझनाहोर्काई यांना जाहीर झाला आहे. आधुनिकोत्तर मानल्या जाणाऱ्या विषय कल्पनांवर लिहिणारे लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत.  २०१५ मधे त्यांना मॅन बुकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. कादंबरी, कथा, लघुकथा,  निबंध,  अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी मुशाफिरी केली आहे. त्यांच्या काही पुस्तकांवर चित्रपट तयार झाले. त्यांचं पटकथा लेखनही लास्लो यांनी केलं होतं.  सतांतांगो, द मेलांकॉली ऑफ रेझिस्टन्स, द वर्ल्ड गोज ऑन ही त्यांची पुस्तकं आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजली आहेत.

**<><><><><>**

महिला क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत आज विशाखापट्टणम् इथं सुरु असलेल्या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी २५२ धावांचं आव्हान ठेवलं आहे. दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. निर्धारित ५० षटकात भारतानं सर्व गडी गमावून २५१ धावा केल्या. रिचा घोषचं शतक थोडक्यात हुकलं. तिनं ७७ चेंडूत ४ षटकार आणि ११ चौकार ठोकत ९४ धावा केल्या. प्रतिका रावलनं ३७, तर स्नेह राणानं ३३ धावांच योगदान दिलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या ४ षटकात १ बाद १० धावा झाल्या होत्या.

पावसामुळे हा सामना उशीरा सुरु झाला असला तरी त्यामुळे षटकांची संख्या कमी केलेली नाही.

**//<><><><><>//**